पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ७२**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १८/०७/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १८/०७/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.लांडगे सारिका संतोष
१२. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४. मा.बारणे अर्चना तानाजी
१५. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.झगडे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें.,

मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता, मा.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट– प्रशा.अधिकारी, मा.झनकर – लेखाधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२३) पीएमपीएल साठी नविन बसेस खरेदी करणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४) पिंपरी चिंचवड मनपा निविदा प्रक्रिया राबवून पाकीट क्र.१ उघडलेनंतर माघार घेणा-या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२५)इ.१० व १२ वीच्या बक्षिस योजना बाबत – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२६)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नाटयगृहांमध्ये समाज प्रबोधन व जन जागृतीसाठीच्या कार्यक्रमांना भाडे शुल्का मध्ये सवलत देणे बाबत. - मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२७) मनपाच्या विविध विभागास आवश्यक अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रूमाल खरेदी करणेबाबत.

विषय क्र.२८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी, मौज भोसरी व मौजे पिंपळे गुरव येथील रस्त्याने/आरक्षणाने बाधीत जागा खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेकामी येणा-या खर्चास मान्यता घेणे बाबत.

विषय क्र.२९)राष्ट्रीय नागरी सुधारणा अंतर्गत (अमृत) पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील मलनि:सारण व्यवस्था व प्रकल्प राबविणे या कामाच्या निविदा पश्चात कामासाठी प्रकल्प व्यावस्थापन सल्लागार नेमणे बाबत.

विषय क्र.३०) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेली पुस्तके खरेदी बाबत.

विषय क्र.३१) पिंपरी चिंचवड मनपाचे क प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे या कामाबाबत.

----------

ठराव क्रमांक - २८९४ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – ड क्षेत्रिय, जलनि:सारण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.डक्षेका/जनि/कावि/१४१/२०१८ दि.४/७/२०१८

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे या कामास मुदतवाढ मिळणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८९५ विषय क्रमांक - ०२
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे कडील जा.क्र.मुलेप/६/कावि/११५/२०१८ दि. १०/७/२०१८

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले नुसार -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१८/०६/२०१८ ते दि.२४/०६/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११५/२०१८ दि.१०/०७/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८९६ विषय क्रमांक - ०३
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – इ क्षेत्रिय, स्थापत्य
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे कडील जा.क्र.इस्था/कावि/६३६/२०१८ दि. १०/७/२०१८

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले नुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार नेमणुकीबाबतच्या समितीची बैठक दि.४/६/२०१८ रोजी मा.शहर अभियंता यांच्या कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी नमूद कामाचे सादरीकरण केलेले आहे.

१) प्रभाग क्र.३ च-होली येथील स.क्र.३०१ ते स.क्र.३१५ पर्यंतच्या १८ मी व २४ मी डि.पी. रस्त्यांचे उर्वरीत कामे करणे.

२) प्रभाग क्र.३ च-होली मुख्य रस्ता (आझाद नगर) ते काळजेवाडी पर्यंतचा १८ मी.डी.पी. रस्ता विकसित करणे.

३) प्रभाग क्र.३ वडमुखवाडी येथील स.नं.१२३ ते स.नं.१८० (९० मी. रस्ता) पर्यंतचा डी.पी.रस्ता विकसित करणे.

सदर सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता देवुन स्वीकारण्यात आलेले आहे. सबब सदर कामास सल्लागार म्हणुन मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी सल्लागार म्हणुन करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणक पत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवर देखरेख करणे इ. निविदा पुर्व (Pre tender) व निविदा पश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची नियुक्ती केलेली आहे. मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे यशस्वीरित्या पुर्ण केलेली आहेत व सध्या देखील चालु आहेत. मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांना रस्ते महामार्गाचे सविस्तर प्रकल्प तयार करणेचाही अनुभव आहे. मनपाच्या स्थायी समिती ठराव क्र.२१३९ दि.७/०२/२०१८ अन्वये केलेल्या Empanelment मध्ये मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा समावेश आहे. प्रस्तावात नमूद बाबींचा विचार करता प्रस्तावात नमुद केलेल्या १ ते ३ कामांसाठी मे.अँशुअर्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करणेचा प्रस्ताव तसेच निविदा पुर्व (Pre tender) व निविदा पश्चात (Post Tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व मनपाचे प्रचलित दरानुसार फी अदा करणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८९७ विषय क्रमांक - ०४

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग– बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निमुर्लन

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.बीपी/०५/कावि/२१५/२०१८ दि.१०/७/२०१८

विषय – अतिक्रमण करणा-यां विरूध्द प्रशासकिय शुल्क वसुल करणे बाबत.

विषय क्र.४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८९८

दिनांक – १८/०७/२०१८

सूचक – मा.अर्चना बारणे

विषय क्रमांक - ०५

विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा

अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे कडील जा.क्र.काशा/४/कावि/११२३/२०१८ दि.९/७/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले नुसार -

पिंपरी चिंचवड मनपाकडील वैद्यकिय विभागाचे वापराकरीता दोन नग चॅसिज TATA LPT 709/34 BS4 with Cab खरेदी करून त्यावर मनपा स्पेशिफिकेशन प्रमाणे शववाहिकी वाहनाचे बॉडी बांधून खरेदीकामी निविदा सुचना क्र.६/२०१७-१८ नि.र.रू.५२,१६,४७०/- (अक्षरी र.रू. बावन्न लाख सोळा हजार चारशे सत्तर फक्त) प्रसिध्द करणेत आली होती प्राप्त ३ निविदा धारकांमध्ये मे.अजिल फायबरटेक यांची प्रति नग र.रू.२१,१२,०००/- प्रमाणे दोन नग करिता र.रू.४२,२४,०००/- (अक्षरी र.रू.बेचाळीस लाख चौवीस हजार फक्त) किंमत असून ती निविदा रकमेपेक्षा १९.०३% कमी येत आहे. सबब, मे.अजिल फायबरटेक यांचेकडून करारनामा करून घेऊन शववाहिका २ नग चॅसिज TATA LPT 709/34 BS4 with Cab खरेदी करून त्यावर मनपा स्पेशिफिकेशन प्रमाणे शववाहिका या वाहनाचे बॉडी बांधून खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८९९

दिनांक – १८/०७/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी

विषय क्रमांक - ०६

विभाग – नागरी सुविधा केंद्र

अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नासुकें/२/कावि/२४७/२०१८ दि.१०/७/२०१८

विषय - खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र चालविणेकामी अंतिम पात्र अर्जदारांना नियुक्त करणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९००

दिनांक – १८/०७/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी

विषय क्रमांक - ०७

विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील जा.क्र.स्था/ह.क्षे/कावि/५३५/२०१८ दि.७/७/२०१८

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका तांत्रिक सल्लागार नेमणुकीबाबत समितीची बैठक दि.२१/०५/२०१८ रोजी मा. शहर अभियंता यांच्या कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये मे.युनिटेक्चर डिझाईन सोल्युशन्स यांनी उपरोकत विषयांकीत कामाचे सादरीकरण केलेले आहे. सदर सादरीकरण समाधानकरक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता देवुन स्वीकारण्यात आलेले आहे. सदर सादरीकरण सल्लागार म्हणून मे.युनिटेक्चर डिझाईन सोल्युशन्स यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी सल्लागार म्हणुन करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणक पत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवर देखरेख करणे इ. निविदा पुर्व (Pretender) व निविदा पश्चात (Post Tender) इ. कामे करावी लागणार आहेत. सदरचे काम तांत्रिक दृष्टया प्रकल्पाचे स्वरुप वैशिष्टपुर्ण आहे. तरी तांत्रिकदृष्टया आराखड्याप्रमाणे काम करुन घेणे त्यांचे मोजमाप घेऊन देयक तयार करणे, प्रकल्पाच्या दैनंदिन कामावर देखरेख करणे, निविदा निर्देशानुसार गुणवत्ता तपासणी करणे, इ. निविदा पुर्व व निविदा पश्चात कामे करणे हे चोखपणे होणे आवश्यक आहे. प्रकल्पाची वरील दैनंदिन कामे परिणामकारण होणेकरीता सदर प्रकल्पासाठी निविदा पुर्व व निविदा पश्चात कामांकरीता वास्तुविशारद नेमणे अत्यंत आवश्यक आहे. सदर कामांसाठी मे. युनिटेक्चर डिझाईन सोल्युशन्स यांची निविदा पुर्व व निविदा पश्चात कामाकरीता नेमणूक करणेत यावी असे मत आहे. त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगती पथावर आहेत त्यांनी मनपाला आत्तापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. त्यानुसार तांत्रिक दृष्ट्या काम करून प्रत्यक्ष जागेवर नियोजित वेळेत अंमलबजावणी होणेचे दृष्टीने मे.युनिटेक्चर डिझाईन सोल्युशन्स यांची नेमणुक करुन त्याकामी लागणारी फी मा. आयुक्त यांनी इमारत बांधकामासाठी मंजूर केलेल्या दराने ५ कोटी पर्यंत एकूण २.७५%, या मनपाच्या मंजूर दराने फी अदा करणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे. तसेच मे. युनिटेक्चर डिझाईन सोल्युशन्स यांची प्रभाग क्र.२० कासावाडी येथील मंत्री कॉप्लेक्स शेजारील मोकळी जागा विकसित करणेकामी वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०१ विषय क्रमांक - ०८
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क प्रभाग कार्यालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील जा.क्र.वि/कप्र/३५०/२०१८ दि.१०/७/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले नुसार -

प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील आरक्षण क्र.८५ येथे नव्याने बांधणेत येणा-या नागरी आरोग्य केंद्र रूग्णालय व निवासी डॉक्टरांचे वसतिगृहासाठी नविन उच्चदाब वीज जोडणीकामी महावितरण कंपनीकडील वीजजोडणी व वीजभार मंजूरी शुल्कापोटी र.रू.३३,०८,७७७/- (अक्षरी र.रू.तेहतीस लाख आठ हजार सातशे सत्याहत्तर फक्त) म.रा.वि.वि. कंपनीस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०२ विषय क्रमांक - ०९
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – दुरसंचार
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील जा.क्र.दुरसंचार/१/कावि/८०/२०१८ दि.१०/७/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले नुसार –

श्री.बहिवाल ओमप्रकाश, आपत्कालीन व्यवस्थापन अधिकारी यांची ६ महिन्याकरिता एकत्रित मानधनावर मनपाचे आपत्ती व्यवस्थापन विभागात नेमणूक झाली आहे. त्यांस आपत्ती कामकाजाकरिता मोबाईल सिम सुविधा वापराची मासिक मर्यादा रू.रू.३००/- (अक्षरी र.रू.तीनशे फक्त) निश्चित करून पूरविणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०३ विषय क्रमांक - १०
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचे कडील जा.क्र.बक्षेआ/५/कावि/४२९/२०१८ दि.१०/७/२०१८

मा. अतिरिक्त आयुक्त(२) यांनी शिफारस केले नुसार -

निविदा नोटीस क्र.२/२०१८-१९ ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्र.क्र.१६ मधील घरोघरचा कचरा गोळा करणे, कचरा कुंड्यामधील कचरा, रस्त्याच्या कडेस व सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा रोजचे रोज उचलुन वाहतुक करुन महानगरपालिकेच्या मोशी कचरा डेपो, येथे नेऊन टाकणे व

पसरविणे या कामासाठी टीपर/ट्रक (७.५ टन क्षमता) प्रती दिन प्रती वाहन दोन खेपा वाहनचालक+चार मजुर+इंधनासह एकुण २ वाहने भाडे तत्वावर पुरविणेकामी ९ महीने कालावधी करीता प्रती दिन प्रती वाहन दोन खेपांचा र.रु.७२४९/-याप्रमाणे अंदाजपत्रकीय दर र.रु.३९,२०,०००/- (अक्षरी र.रू.एकोणचाळीस लाख वीस हजार फक्त) अन्वये निविदा प्रसिध्द करणेत आली होती. त्यामध्ये मे.दिन महिला आधार रोजगार संस्था यांनी मोशी डेपोसाठी र.रु.५९८०/- हा लघुत्तम दर सादर केला असुन या दराप्रमाणे होणारा खर्च र.रु.३२,२९,२००/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख एकोणतीस हजार दोनशे फक्त) इतका असुन दर स्वीकृतीस दि.०७/०७/२०१८ च्या प्रस्तावानुसार मान्यता मिळाली आहे. मे.दिन महिला आधार रोजगार संस्था यांना इकडील पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/३८८/२०१८ दि.२२/०६/२०१८ अन्वये सदरचे काम दि.२५/०६/१८ पासुन सुरु करणेस कळविणेत आले आहे. त्यानुसार २ वाहनांसाठी ९ महीने करीता येणा-या र.रु.३२,२९,२००/- खर्चास व या खेपा व्यतिरीक्त होणा-या जादा खेपाच्या होणा-या अतिरीक्त खर्चास मान्यता घेणे, कामाचा आदेश देणे, करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०४ | विषय क्रमांक - ११

दिनांक – १८/०७/२०१८ | विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे कडील जा.क्र.मुलेप/१/कावि/८१७/२०१८ दि.१२/७/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले नुसार -

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०५ | विषय क्रमांक - १२

दिनांक – १८/०७/२०१८ | विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य

सूचक – मा.करूणा चिंचवडे | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे कडील जा.क्र.कक्षे/स्था/कावि/२८६/२०१८ दि.११/७/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले नुसार -

. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक वास्तुविशारद नेमणूकीबाबतच्या समितीची बैठक दि.०४।०६।२०१८ रोजी मा. शहर अभियंता यांचे कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये

M/s.Jyoti Panase & Associates यांनी प्रभाग क्र.९ नेहरूनगर येथील जुनी शाळा इमारत पाडून नविन शाळा इमारत बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामाचे सादरीकरण केलेले आहे. सदरचे सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामास वास्तुविशारद म्हणून M/s.Jyoti Panase & Associates यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वास्तुविशारद म्हणून करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक व निविदा तयार करणे तसेच कामावर देखरेख करणे इत्यादी निविदा पूर्व (pretender) व निविदानंतर (post tender)इत्यादी कामे करावी लागणार आहेत. M/s.Jyoti Panase & Associates यांनी अशा प्रकारच्या कामांसाठी प्रकल्प वास्तुविशारद म्हणून यशस्वीरित्या कामे पूर्ण केली आहेत. मनपाच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१|०१|२०१८ अन्वये M/s.Jyoti Panase & Associates यांची मनपाच्या पॅनेलवर वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता सदर कामासाठी M/s.Jyoti Panase & Associates यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव तसेच निविदा पूर्व (pre tender ) निविदानंतर (post tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेस व मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१|०१|२०१८ अन्वये मान्यता दिलेल्या मंजूर दरानुसार फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०६ विषय क्रमांक - १३

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे कडील जा.क्र.कक्षे/स्था/कावि/२८५/२०१८ दि.११/७/२०१८

मा. अतिरिक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले नुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक वास्तुविशारद नेमणूकीबाबतच्या समितीची बैठक दि.७|५|१८ रोजी मा.शहर अभियंता यांचे कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकी मध्ये M/S Nangrepatil and Associates यांनी खालील कामांचे सादरीकरण केलेले आहे.

१) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील यशवंतनगर चौक सुशोभिकरण काम करणे (नि.क्र.७/५३-२०१७-१८)

२) प्रभाग क्र.२८ येथील रसरंग चौक व झिरोबॉईज चौकाचे सुशोभिकरण काम करणे (नि.क्र.२६/५३-२०१७-१८)

३) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद चौकाचे

सुशोभिकरण काम करणे (नि.क्र.५/५३-२०१७-१८)

सदरचे सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामास वास्तुविशारद म्हणून M/S Nangrepatil and Associates यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वास्तुविशारद म्हणून करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामाचे निविदानंतर (post tender) ची कामे करावी लागणार आहेत. M/S Nangrepatil and Associates यांनी अशा प्रकारच्या कामांसाठी प्रकल्प वास्तुविशारद म्हणून यशस्वीरित्या कामे पूर्ण केली आहेत. मनपाच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१।०१।२०१८ अन्वये M/S Nangrepatil and Associates यांची मनपाच्या पॅनेलवर वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता सदर कामासाठी M/S Nangrepatil and Associates यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव तसेच निविदानंतर (post tender) कामांसाठी वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेस व मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१।०१।२०१८ अन्वये मान्यता दिलेल्या मंजूर दरानुसार फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०७ विषय क्रमांक - १४

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे कडील जा.क्र.कक्षे/स्था/कावि/२८७/२०१८ दि.११/७/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले नुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार नेमणूकीबाबतच्या समितीची बैठक दि.०४।०६।२०१८ रोजी मा.शहर अभियंता यांचे कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये मे.हार्दिक पांचाळ आर्किटेक्ट यांनी क प्रभागात ठिकठिकाणी सुशोभिकरणाचे कामाचे सादरीकरण केलेले आहे. सदरचे सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामास सल्लागार म्हणून मे.हार्दिक पांचाळ आर्किटेक्ट यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सल्लागार म्हणून करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक व निविदा तयार करणे तसेच कामावर देखरेख करणे इत्यादी निविदा पूर्व (pretender) व निविदानंतर (post tender) इत्यादी कामे करावी लागणार आहेत. मे.हार्दिक पांचाळ आर्किटेक्ट यांनी अशा प्रकारच्या कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून यशस्वीरित्या कामे पूर्ण केली आहेत. मनपाच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१।०१।२०१८ अन्वये मे.हार्दिक पांचाळ आर्किटेक्ट यांची मनपाच्या पॅनेलवर सल्लागार म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता प्रस्तावात नमुद केलेल्या कामासाठी मे.हार्दिक पांचाळ

आर्किटेक्ट यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव तसेच निविदा पूर्व (pre tender) निविदानंतर (post tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्गागर म्हणून नेमणूक करणेस व मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१।०१।२०१८ अन्वये मान्यता दिलेल्या मंजूर दरानुसार फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०८ विषय क्रमांक - १५

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क क्षेत्रिय, स्थापत्य

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे कडील जा.क्र.कक्षे/स्था/कावि/२८८/२०१८ दि.११/७/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले नुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक वास्तुविशारद नेमणूकीबाबतच्या समितीची बैठक दि.०४।०६।२०१८ रोजी मा.शहर अभियंता यांचे कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये M/s.Earthscap Architect & Consultants यांनी प्रभाग क्र.५ जाधववाडी कुदळवाडी से.क्र.१६ सावतामाळी उद्यानाशेजारील मोकळ्या जागेत महिला व पुरूषांसाठू स्वतंत्र्य व्यायामशाळा इमारत व सुसज्ज सभागृह बाधणे या कामाचे सादरीकरण केलेले आहे. सदरचे सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामास वास्तुविशारद म्हणून M/s.Earthscap Architect & Consultants यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वास्तुविशारद म्हणून करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रक व निविदा तयार करणे तसेच कामावर देखरेख करणे इत्यादी निविदा पूर्व (pretender) व निविदानंतर (post tender) इत्यादी कामे करावी लागणार आहेत. M/s.Earthscap Architect & Consultants यांनी अशा प्रकारच्या कामांसाठी प्रकल्प वास्तुविशारद म्हणून यशस्वीरित्या कामे पूर्ण केली आहेत. मनपाच्या मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१।०१।२०१८ अन्वये M/s.Earthscap Architect & Consultants यांची मनपाच्या पॅनेलवर वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता सदर कामासाठी M/s.Earthscap Architect & Consultants यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव तसेच निविदा पूर्व (pre tender) निविदानंतर (post tender) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेस व मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३० दि.३१।०१।२०१८ अन्वये मान्यता दिलेल्या मंजूर दरानुसार फि अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९०९ विषय क्रमांक - १६
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे कडील जा.क्र.मातंवि/१४/कावि/२८/२०१८ दि.१३/७/२०१८

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले नुसार -

महापालिकेमार्फत नागरीकांना देण्यात येणा-या सेवांमध्ये सुधारणा करणेसाठी शहर परिवर्तन कार्यालयामार्फत (CTO) नागरीक सर्वेक्षण कामकाजासाठी, सर्वेक्षण फॉर्म्स नमुन्याप्रमाणे छपाई करुन, नागरीकांमार्फत भरुन सादर करणेसाठी प्रसिध्द करणेत आलेल्या कोटेशन नुसार लघुत्तम दराचे पुरवठाधारक प्रेरणा पब्लिसिटी यांना र.रु.१,९९,९९०/- (अक्षरी र.रू.एक लाख नव्व्याण्णव हजार नऊशे नव्वद फक्त) चे कामकाज आदेश दिलेले असून सदर खर्चाचे अवलोकन करणेस व सदरचा खर्च सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१० विषय क्रमांक - १७
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.नगरसचिव यांचे कडील जाक्र.नस/१/कावि/५९१/२०१८ दि.१३/७/२०१८

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले नुसार -

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९११ विषय क्रमांक - १८
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – विद्युत यांत्रिकी
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे कडील जा.क्र.विमुका/५/कावि/२६७/२०१८ दि.१२/७/२०१८

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केले नुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ १ ते ७ मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१२ विषय क्रमांक - १९
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – विद्युत (मुख्यालय)
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे कडील जा.क्र.विमुका/५/कावि/२६६/२०१८ दि.१२/७/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले नुसार -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.3/1/2018-19 अन्वये सांगवी स्मशानभूमी मधील गॅस शवदाहीनी देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे.कल्याणी एंटरप्रायजेस नि.र.रू.47,28,000/- (अक्षरी र.रु.सत्तेचाळीस लाख अठ्टावीस हजार फक्त) पेक्षा 11% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.42,07,920/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१३ विषय क्रमांक - २०
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे कडील जा.क्र.कक्षे/वि/जा/३५७/२०१८ दि.१२/७/२०१८

मा. क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले नुसार -

प्रभाग क्र.२ मधील रामायण मैदान, जाधववाडी चिखली येथे दिनांक २३/०३/२०१८ ते दि.२४/३/२०१८ रोजी झालेल्या माजी महापौर संजोग भिकू वाघेरे (पाटील) महापौर चषक राष्ट्रीय बॉडी बिल्डिंग स्पर्धा (सन१७-१८) करिता तात्पुरती ध्वनिक्षेपण, जनित्र संच, व प्रकाश व्यवस्था करणेबाबतचे काम तातडीने करणेबाबत क्रिडा विभागाने त्यांचे पत्र क्र.क्रिडा/४/कावि/९६/२०१८ दि.१९/३/१८ अन्वये इकडील विभागास कळविले होते. सदर काम तातडीचे असलेने मे.त्रिमूर्ती मंडप स्पिकर्स अँड इलेक्ट्रीकल यांचेकडून पूर्व स्विकृत निविदा क्र.५/८/१७-१८ च्या निविदा दरा पेक्षा कमी दराने म्हणजेच ८.५% कमी दराने थेट पध्दतीने करून घेणेत आले आहे. सदर

एजन्सीने त्यांचे कडील पत्र दि.२०/३/१८ अन्वये सदर काम अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा म्हणजेच र.रू.९,९७,२३१/- पेक्षा ८.५% कमी दराने करणेस तयार असलेबाबत कळविले होते. त्यानुसार मे.त्रिमूर्ती मंडप स्पिकर्स अँड इलेक्ट्रीकल यांना आदेश क्र.कक्षेका/वि/जा/१२६/२०१८ दि.२१/३/१८ अन्वये आदेश देणेत आले आहेत. त्यांस दि.२१/३/१८ रोजी मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदर काम मे. त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स अँड इलेक्ट्रीकल यांचेकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता करून घेतलेने सदर कामाचा प्रत्यक्ष खर्च र.रु.९,१२,४४९/- (अक्षरी र.रू.नऊ लाख बारा हजार चारशे एकोणपन्नास फक्त) मे. त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स अँड इलेक्ट्रीकल यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१४ विषय क्रमांक - २१

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क्रिडा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.क्रिडा/४/कावि/१७५/२०१८ दि.४/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले नुसार -

मा.क्रीडा, कला, साहित्य सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१९ दि.१३/७/२०१८ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११०३३ यांच्या सहकार्याने दि. २९ ते ३१ जुलै २०१८ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ४११०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१८-१९ (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.३,८२,९६०/-(अक्षरी र.रु.तिन लाख ब्याऐंशी हजार नऊशे साठ फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत र.रू.३,१२,९६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१५ विषय क्रमांक - २२
दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क्रिडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.क्रिडा/४/कावि/२२७/२०१८ दि.४/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले नुसार -

मा.क्रीडा, कला, साहित्य सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२० दि.१३/७/२०१८ नुसार शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर,पंच मानधन, पंच चहा अल्पोपहार खर्च,नारळ,पूजा खर्च,सत्कारार्थ पुस्तके खरेदी, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन/निविदा पद्धतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा उपस्थित क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक, पाहुणे यांचा चहापान-अल्पोपहार खर्च, पाहुणे सत्कारार्थ साहित्य भाडेपोटी खर्च,नाट्यगृह भाडे इतर खर्च इ.,सन २०१८-१९ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी म.न.पा. शाळेतील अंदाजे १५० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर ७५, राष्ट्रीय पातळीवर २५ शालेय खेळाडू,त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च,दैनिक भत्ता,प्रवेश फी, औषध खर्च इ.अदा करणेकामी अंदाजे र.रु.५०,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.२५,२५,१००/-(अक्षरी र.रु.पंचवीस लाख पंचवीस हजार शंभर फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी- वार्षिक स्पर्धा क्रीडा कला व क्रीडा कला साहित्य या २ लेखाशिर्षावर केलेल्या अनुक्रमे प्रत्येकी र.रु.२०,००,०००/- प्रमाणे एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे.त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २९१६ विषय क्रमांक - २३
दिनांक – १८/०७/२०१८
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड मनपा मा.महापालिका सभा ठराव क्र.९१० दि.२३/७८/२०१८ अन्वये पिं.चिं.मनपाच्या वतीने पी.एम.पी.एम.एल. ६०:४० या तत्वानुसार घेण्यात येणा-या १५५० बसेस पैकी ५५० वातानुकूलित बसेस ए.एस.आर.टी.यु. या केंद्र शासनाच्या अंगिकृत संस्थेकडून घेण्यास, १०० बसेस पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ६०:४० या तत्वानुसार खरेदी करण्यास व उर्वरित ९०० बसेस मार्केट फायनान्स मेकॅनिझम या प्रमाणे महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत ४ सदस्य समितीने ठरविलेल्या स्पेसिफिकेशन व सेवास्तर कराराप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे. आज रोजी पी.एम.पी.एम.एल. कडून फक्त २०० बसेस खरेदी झाल्याचे समजते. सुमारे दोन वर्षापुर्वी मान्यता देवून सुध्दा पी.एम.पी.एम.एल. कडून बसेस खरेदीस अत्यंत विलंब होत आहे परिणामी शहरातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे पी.एम.पी.एम.एल. च्या मागणीनुसार व स्पेसिफिकेशन नुसार लेखा विभागाकडील बसेस खरेदी या तरतूदीमधून बसेस मनपा मार्फत खरेदी करून पी.एम.पी.एम.एल. ला उपलब्ध करूनदेणे बाबतचा विषय धोरणात्मक बाब म्हणून मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१७ विषय क्रमांक - २४
दिनांक – १८/०७/२०१८
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

दि. ०१ एप्रिल २०१८ पासून पिंपरी चिंचवड मनपाच्या विविध विभागाच्या नियमानुसार निविदा प्रक्रीया राबविल्या नंतर पाकीट क्र.१ उघडल्यानंतर शुल्लक कारणास्तव (उदा.चुकीचे दर भरले गेले म्हणून माघार घेतले जातात परंतु निविदा भरताना ठेकेदार निविदा अटी व शर्तीनुसार भरत असतात. पाकीट क्र.१ उघडल्या नंतरच दर चुकीचे भरले असे का वाटते?) निविदा माघार घेणा-या संबंधित ठेकेदारास महापालिकेच्या काळ्या यादीत टाकणेत यावे. तसेच पाकीट क्र.१ उघडल्या नंतरच निविदा माघार घेणा-या संबंधित ठेकेदाराचे पाकीट क्र.२ उघडण्यात येत नाही ते

पाकीट क्र.२ पण उघडून प्रक्रीया पुर्ण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करण्यात यांवी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१८ विषय क्रमांक - २५

दिनांक – १८/०७/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इ.१० वी व १२ वी च्या पास होणा-या गुणवंत विद्यार्थांना बक्षिस योजना सध्या राबविली जात आहे. सदर योजनेस "शामा प्रसाद मुखर्जी बक्षिस योजना" असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करण्यात यांवी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९१९ विषय क्रमांक - २६

दिनांक – १८/०७/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नाट्यगृहामध्ये समाजप्रबोधनपरचे व्याख्याने व जनजागृती कार्यक्रम उदा. १) शैक्षणिक मार्गदर्शन २) पर्यावरण मार्गदर्शन ३) पाणी बचतीचे मार्गदर्शन ४) प्रदुष्ण मुक्ती जनजागृती ५) बेटी बचाव, बेटी पढाव ६) झाडे लावा, झाडे जगवा ७) व्यसनमुक्तीसाठी जनजागृती अशा कार्यक्रमांना भाडे शुल्कामध्ये प्रति ३ तासांना ४०००/- भाडे अधिक नियमानुसार जी.एस.टी. वेगळा आकारण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करण्यात यांवी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९२० विषय क्रमांक - २७

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.मभां/०४/कावि/५२८/२०१८ दि.१७/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले नुसार –

मनपाचे विविध विभागास आवश्यक अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक कापड पुरवठा/यंत्रमाग कापड (हातमाग कापडा शिवाय) नियत किमंत/दरपत्रक/2018-19/65/18 एप्रिल 2018, संदर्भ - उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/ भाग-3/उद्योग-4/ दि.01 डिसेंबर 2016 अन्वये महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचेकडुन अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल विविध रंगात 36*36 इंच साईजमध्ये शिलाई करुन रुमाल तयार करणे व त्यास नाडी लावणे व रुमालाचे समप्रमाणत मनपा बोधचिन्ह छपाई सह 22,000 नग, प्रती नग र.रु.89.46 प्रमाणे खरेदीकामी र.रु.19,68,120/- (अक्षरी र.रु.एकोणीस लाख अड्डुसष्ट हजार एकशे वीस फक्त) चे खर्चास दर करार नुसार करारनामा न करता थेट पध्दतीने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९२१ विषय क्रमांक - २८

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नरवि/कावि/३६/च-होली/१८५/२०१८ दि.१८/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले नुसार –

मौजे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील ठिकाणच्या रस्त्याने/ आरक्षणाने बाधित जागा महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबत दि. ०४/०७/२०१८ रोजी खाजगी वाटाघाटी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये खाली नमुद विषय क्रं. १ ते ४बाबत संबंधीत मिळकतधारक यांचे समक्ष सांगोपांग चर्चा करून मा. खाजगी वाटाघाटी समितीने जुन्या हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील रस्ते व आरक्षणांचा मोबदला संबंधीत मिळकतधारकास खाजगी वाटाघाटीने देणेत यावा असे ठरले आहे.

| अ.क्र. | विषय | रस्ता/आरक्षण | क्षेत्र (चौ.मी) | मुल्यांकन र.रु |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं.३१४/२पै मधिल १८.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्राची खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १८.०० मी. रस्त्याने बाधित | २७३.१२ | ७०,८४,७३३/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मौजे पिंपरी वाघेरे येथिल स.नं. १०३/२ क मधिल २०.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्राची खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | २०.०० मी. रस्त्याने बाधित | १२०९.५० | २,८०,०३,५५३/- |
| ३ | मौजे भोसरी (कासारवाडी) येथील स.नं. ५०३/३. ५०४/४ पै यासी सि.स.नं.१९७६ पै. १९७८ पै. मधिल १२.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्राची खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | १२.०० मी. रस्त्याने बाधित | ५६४.२५ | ४५,३३,१८४ |
| ४ | मौजे पिंपळे गुरव येथील स.नं. ७२/२ मधिल मंजूर विकास योजनेतील आ.क्र. ३४९ (शॉपिंग सेंटर ) याने बाधित क्षेत्राची खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.. | आ.क्र. ३४९ (शॉपिंग सेंटर) याने बाधित | ४,००० चौ.मी | ५,५०,७५,८००/- |

तरी वरील पैकी क्र.१ ते ४ मध्ये नमूद केलेल्या मुल्यांकन रक्कमेला व त्या त्या अनुषंगाने लागणा-या मुद्रांकशुल्क, नोंदणी फी, वकील फी व इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९२२ विषय क्रमांक - २९

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – जलनि:सारण, मुख्य कार्या.

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.जनि/कावि/११०७२/१८/२०१८ दि.१८/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले नुसार –

राष्ट्रीय नागरी सुधारणा (अमृत) पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील मलनि:सारण व्यवस्था व प्रकल्प राबविणेकामी निविदा पश्चात कार्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सलालगार नेमणेकामी आदेश दिनांक ०७/०३/२०१७ रोजी देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत २४ महिने असून सदर कामांतर्गत पिंपरी चिंचवड महानगर पालिका हद्दीमध्ये मलवाहिनी टाकणे व कार्यान्वित करणे, ४ उदंचन केंद्र व ३ मैलाशुद्धीकरण प्रकल्प डिझाईन, बांधकाम करून कार्यान्वित करणे, व सहा महिने चाचणी देऊन ५ वर्ष निगा व देखभाल दुरुस्ती या कामाचा समावेश आहे. राष्ट्रीय नागरी सुधारणा अंतर्गत (अमृत) कामाचे निविदा पूर्व कार्यात पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या

हद्दीतील जुन्या मलनिःसारण नालिकेचे सर्व्हे करणे, तांत्रिक दृष्ट्या अचूक व पुढील 30 वर्षाचा कालावधी गृहीत धरून नव्याने टाकण्यात येणा-या मलनिःसारण नलिकांची हायड्रॉलिक डिझाईन करणे व ते कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणे (COEP) यांच्या कडून तपासणी करणे व सदरचा विस्तृत अहवाल तयार करण्याचे कामाचा समावेश करणेत आला होता.सदरच्या निविदा पूर्वकार्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कामासाठी मा.आयुक्त यांचे कडील क्र.जनि/TBdrainage /७६/२०१५ दिनांक ४/४/२०१५ नुसार प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावाद्वारे मे.युनिटी कन्सल्टंट यांची निविदा पूर्वकार्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणेत आलेली आहे. वरील संदर्भीय कामात ४ उदंचन केंद्र व ३ मैलाशुद्धीकरण बांधणे व सुमारे २०९ कि मी मलनिःसारण नलिका टाकणे हया कामाचा तांत्रिक दृष्ट्या विस्तृत स्वरूपाची असल्यामुळे निविदा पश्चात कार्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. मे.युनिटी कन्सल्टंट (U.I.E.W) यांचा निविदापुर्वीची राष्ट्रीय नागरी सुधारणा अंतर्गत (अमृत) कामाचे कार्याच्या अनुभव पाहता या कामी त्यांची नेमणूक करणे योग्य होईल असे मत आहे.सदर कामासाठी तांत्रिक फी अदा करणेसाठी सन२०१८-१९ मधील अंदाजपत्रकातील अमृत योजने अंतर्गत लेखाशीर्ष खाली पृष्ठ क्र५१३ अ.क्र.१९ नुसार तरतूद ठेवण्यात आली आहे व हया कामातून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे शक्य आहे. पि.चि.म.न.पा मधील विविध विकास कामांच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कार्यासाठी महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग शासन निर्णय क्र:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि -१६ दिनांक ०४ जून, २०१८ अन्वये एकूण २ टक्के इतके शुल्क निविदे पूर्व व निविदे पश्चात कार्यासाठी विहित केले आहे. तसेच मे.युनिटी कन्सल्टंट (U.I.E.W) यांची मा.आयुक्त यांचे कडील क्र.जनि/TBdrainage/७६/२०१५ दिनांक ४/४/२०१५ नुसार निविदा पूर्वकार्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारासाठी १.३५ टक्के शुल्क अधिक सेवाकर या प्रमाणे नेमणूक करणेत आली आहे व उर्वरित ०.६५ टक्के शुल्क अधिक सेवाकर या प्रमाणे निविदा पश्चात कार्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे योग्य होईल. सबब उपरोक्त विषयांकित राष्ट्रीय नागरी सुधारणा अंतर्गत (अमृत) कामासाठी निविदा पश्चात कार्यासाठी मे.युनिटी कन्सल्टंट (U.I.E.W) यांची उर्वरित ०.६५ टक्के शुल्क अधिक सेवाकर या प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यास तसेच वरील प्रमाणे फी अदा करणेस व मे.युनिटी कन्सल्टंट (U.I.E.W) यांच्याशी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९२३ विषय क्रमांक - ३०

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.मभां/८/कावि/९८९/२०१८ दि.१७/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले नुसार –

मनपाचे वैद्यकिय विभागास मे. बी.जे मेडीकल को.ऑपरेटिव्ह कन्झुमर स्टोअर लि, पुणे यांचेकडुन विविध शाखेची व विविध प्रकारची पुस्तके थेट पध्दतीनेखरेदी करणेस व त्याकामी र.रू.25,22,392/- (अक्षरी र.रू. पंचवीस, लाख बावीस हजार तीनशे ब्यान्नव फक्त) सर्व करासह असे एकुण रकमेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम अनूसुचीत प्रकरण ५ (२) (२) नुसारयेणा-या प्रत्यक्ष खर्चास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९२४ विषय क्रमांक - ३१

दिनांक – १८/०७/२०१८ विभाग – क क्षेत्रिय, जलनि:सारण

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.कक्षेका/जनि/कावि/१३१/२०१८ दि.१८/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले नुसार –

पिंपरी चिंचवड म.न.पा. चे क प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी मे.आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा.लि. हे करीत आहेत.सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार सदर निविदेचा कालावधी ५ वर्षांचा असुन सुरुवातीस कामाचा आदेश १ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेचे मुदत वाढ देणेत येईल याप्रमाणे अटी व शर्तीमध्ये नमुद करणेत आलेले आहे. त्यानुसार सदरच्या निविदेस मा. स्थायी समितीचे ठराव क्र.१६६००, दि.२८/०६/२०१६ अन्वये मंजूरी मिळाली आहे. मा.स्थायी समिती ठरावनुसार सदर कामाचे निविदा र.रू.१,०५,५१,२७६/- साठी १.५०% कमी या दराने म्हणजेच र.रू.१,०३,९३,००७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच सुरूवातीस एक वर्ष कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळाली आहे. ठेकेदार मे.आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा.लि. यांनी सदरचे काम समाधानकारकरित्या पुर्ण केले असल्याने मा.स्थायी समितीने सदर कामास पुढील ५ पैकी दुसऱ्या वर्षा करीता ठराव क्र.१९४७७, दि.२३/१२/२०१६अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामातील मुळनिविदा शर्थ व

अट क्र.४ नुसार ५ वर्षापैकी पहिल्या दोनवर्षाची मुदत पुर्ण होत असल्याने पुढील १ वर्ष (तृतीय वर्ष) कालावधीसाठी येणा-या खर्चास व निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार निविदा दरात १०% वाढ करून पुढील तृतीय वर्षाकरीता मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. सद्यस्थितीत चालू असलेले डिझेल व लेबरचे दर तसेच सदर कामाची निविदा भरले त्यावेळचे दर यांची तुलना केली असता प्रपत्र ब प्रमाणे निविदा स्विकृती योग्य दर १५.००% इतका जास्त येत आहे. सदरचा वाढीव दर १५.००% पाहता निविदा अटी व शर्ती प्रमाणे ठेकेदार यांना १०% दरवाढ देणेस हरकत वाटत नाही. त्यानुसार पुढील एक वर्ष कालावधीसाठी ठेकेदार यांना १०% दरवाढ देऊन येणारा खर्च र.रू.१,१६,०६,४०४ /- पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/९२५/२०१८
दिनांक - १९/०७/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.वि.मुका/५/कावि/२६७/२०१८ विषय क्र.१८ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८
विद्युत विभाग
प्रपत्र - अ

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाच्या आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. विमलाई इले.कार्पो | 31/2-2017-18 | सांगवी येथील मधुवन सोसायटी येथील आरक्षण क्रमांक 316 सर्वे नं 16 उद्यान विकसित करणे कामांतर्गत उर्वरित विद्युत विषयक काम करणे | 5/6/2018 | विमुका/5/कावि/ 231/2018 | दि. 18/06/2018 | 1392612 | 22.87 % कमी | 1074122 |
| 2 | मे. जे.पी. ट्रफिक अटोमेशन प्र | 17/40-2017-18 | इ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत पुणे नाशिक रस्त्याच्या पूर्व भागातील रस्त्यावरील विविध चौकात आवश्यकतेनुसार ट्रफिक सिग्नल बसविणे व नुतनीकरण करणे (नवीन प्रभाग क्रमांक 3 ते 8) | 26/02/2018 | विमुका/5/कावि/ 166/2018 | दि. 31/03/2018 | 1049863 | 11.1 % कमी | 933328 |
| 3 | मे. विमलाई इले.कार्पो | 12/5-2016-17 | मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयातंर्गत नव्याने विकसीत होणा-या उद्यानांचे विद्युतीकरण करणे 1 | 8/3/2018 | विमुका/5/कावि/ 230/2018 | दि. 18/06/2018 | 748750 | 11.21 % कमी | 664815 |
| 4 | मे. कमल इलेक्ट्रिक एंटरप्रायजे | 17/42-2017-18 | भोसरी विभागातील नवीन प्रभाग क्रमांक 6 येथील दिव्यांचे नुतनीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे | 14/06/2018 | विमुका/5/कावि/ 232/2018 | दि. 20/06/2018 | 750000 | 15.16 % कमी | 636300 |
| 5 | मे. विमलाई इले.कार्पो | 17/33-2017-18 | मोशी प्रभाग क्रमांक 6 (नवीन प्रभाग क्रमांक 2) मधील स्वराज गार्डन, नागेश्वर नग, गायकवाडनगर व पुणे नाशिक रस्त्यालगतचे परिसरातील दिव्यांचे नुतनीकरण करणेबाबत | 14/06/2018 | विमुका/5/कावि/ 248/2018 | दि. 29/06/2018 | 697841 | 17.21 % कमी | 577743 |
| 6 | मे. विमलाई इले.कार्पो | 06/12-2016-17 | दिघी उपविभागांतर्गत प्रभाग क्रमांक 7 च-होली येथे विविध चौकात हायमास्ट दिवे उभे करुन प्रकाश व्यवस्था करणे | 4/5/2018 | विमुका/5/कावि/ 229/2018 | दि. 18/06/2018 | 599956 | 7.01 % कमी | 557899 |
| 7 | मे. मिहीर एंटरप्रायजेस | 4/1-2018-19 | क प्रभागांतर्गत रस्तारुंदीकरण व विविध प्रकल्पांच्या कामास अडथळा ठरणारे म.रा.वि.वि. मंडळाचे फीडर, उच्चदाब लघुदाब पोल व तारा हलविणे. (स्केटींग मैदान ) | 28/06/2018 | विमुका/5/कावि/ 245/2018 | दि. 27/06/2018 | 1375864 | 17.1 % कमी | 1140591 |
| | | | | | | Total | 6614886 | | 5584798 |

सहशहर अभियंता(वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८